नि. ③

पर्यावरण विभाग,
पुणे महानगरपालिका
जावक क्र:. ९६६
दिनांक : 23/01/2026

## जाहीर आवाहन

**विषयः-** पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बेकरी/हॉटेल्स/रेस्टोरंट/खाद्यपदार्थ स्टॉल/ ढाबा/ तंदूर हॉटेल्स यांमध्ये हरित इंधनांचा वापर करण्याबाबत जाहीर आवाहन.

हवा प्रदूषण कमी करण्याच्या योजनेचा एक भाग म्हणून, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) बेकरी/हॉटेल्स/रेस्टोरंट/खाद्यपदार्थ स्टॉल/ढाबा/तंदूर हॉटेल्स यांमध्ये लाकूड/कोळसा इत्यादीच्या वापराऐवजी एलपीजी, पीएनजी, विद्युत इ. हरित ऊर्जेच्या स्त्रोतांचा अवलंब करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

शहरातील हवा प्रदूषण गुणवत्तेत सुधारणा करणेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अन्न पदार्थ तयार करताना व्यावसायिक स्वरूपातील लाकूड/ कोळसा यांसारखे इंधनापासून निर्माण होणाऱ्या धूर व हवा प्रदूषणावर नियंत्रण आणणेकरिता शहरांमधील बेकरी/हॉटेल्स/रेस्टोरंट/खाद्यपदार्थ स्टॉल/ढाबा/तंदूर हॉटेल्स सारख्या व्यवसायांकरिता हरित इंधन जसे की एलपीजी, पीएनजी किंवा विद्युत इ. च्या वापरावर भर देणेस कळविले आहे.

तरी, शहरातील वाढते हवा प्रदूषण कमी करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेमार्फत दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ रोजी हवा (प्रदूषण आणि नियंत्रण) अधिनियम १९८१ चे कलम ३१ (अ) तसेच दिनांक ७ मार्च २०२४ रोजी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम ५ अंतर्गत जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बेकरी/हॉटेल्स/रेस्टोरंट/खाद्यपदार्थ स्टॉल/ढाबा/तंदूर हॉटेल्स यांमध्ये लाकूड/कोळसा इत्यादी पारंपारिक इंधनाच्या वापराऐवजी हरित इंधन जसे कि, एलपीजी, पीएनजी किंवा विद्युत स्त्रोतांचा वापर एक वर्ष कालावधीच्या आत रुपांतरीत करावा असे नमूद केले आहे. सदर इंधन रुपांतरीत करण्याचा कालावधी संपुष्टात आला आहे याची नोंद घ्यावी.

पुणे शहरातील सर्व बेकरी/हॉटेल्स/रेस्टोरंट/खाद्यपदार्थ स्टॉल/ढाबा/ तंदूर हॉटेल्स मध्ये व्यावसायिक कामासाठी अन्न पदार्थ तयार करताना लाकूड/कोळसा यांसारखे इंधनांपासून तयार होणारे धुरामुळे होणाऱ्या हवा प्रदूषणावर नियंत्रण आणणेकरिता सदर जाहीर आवाहनचे प्रसिद्धी दिनांकापासून पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील सर्व बेकरी/हॉटेल्स/रेस्टोरंट/खाद्यपदार्थ स्टॉल/ढाबा/तंदूर हॉटेल्स या ठिकाणी एलपीजी, पीएनजी किंवा विद्युत यांसारख्या हरित/स्वच्छ इंधनाचा वापर सुरु करणे आवश्यक आहे.

तरी, सदर ठिकाणी तपासणी दरम्यान रुपांतरीत इंधन वापराबाबतचे निकष आढळून न आल्यास व नियमांचे पालन न झाल्यास पुणे महानगरपालिकेमार्फत पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(पृथ्वीराज बी.पी.) 23/1/26
अतिरीक्त महापालिका आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका